# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email- roaurangabad@dtemaharashtra.gov.in


**परिपत्रक**

**जा.क्र.विकाऔ/शिक्षण/२०२०/ 670**

**दिनांक : 26 FEB 2020**

प्रति,

प्राचार्य,

सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित पदविका/पदवी/पदयुत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,

औरंगाबाद विभाग.

विषयः **श्रीम विद्या चव्हाण व इतर वि प स यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ३२८**

संदर्भः १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १६/आस्था/सॅनिटेरी नॅपकीन/२०१६/७६, दिनांक २३/०२/२०१६

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १६/आस्था/सॅनिटेरी नॅपकीन/२०२०/८१, दिनांक २६/०२/२०२०

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकित शासनपत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, श्रीम.विद्या चव्हाण, विधान परिषद सदस्य यांनी लक्षवेधी सूचनेमध्ये राज्यातील महिलांना सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करुन देण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी सॅनिटरी नॅपकीन वेंडिग मशीन्स, डिस्पोजल मशीन बसविणे व स्वच्छता याबाबत ठोस कार्यक्रम राबविण्याबाबत मुद्या उपस्थित केला आहे. यापूर्वी आपल्या संस्थेमध्ये सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीन्स व डिस्पोजल्स मशीन्स बसविण्याबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

आपल्या संस्थेमध्ये सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीन्स व डिस्पोजल्स मशीन्स बसविली नसल्यास संस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या अनुदानातुन सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीन्स व डिस्पोजल्स मशीन्स तात्काळ बसविण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

सुलभ संदर्भाकरीता संचालनालयाच्या संदर्भ क्र. १ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. सदरील पत्रात दिलेल्या निर्देशाप्रमाणे मशीन्स खरेदीबाबत कार्यवाही करावी.

सोबत : उपरोक्त प्रमाणे

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

# तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी — ३०२३३४७६, २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स - २२६९०००७.

E-mail : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in


ईमेलव्दारे
प्रथम प्राधान्याने

क्रमांक :१६/आस्था/सॅनिटरी नॅपकीन/२०२०/८१
दिनांक : 26/2/2020

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

**विषय : श्रीम विद्या चव्हाण व इतर वि प स यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.३२८**

**संदर्भ : १) या संचालनालयाचे पत्र क्र. १६/आस्था/सॅनिटरी नॅपकीन/२०१६/७६, दिनांक २३.२.२०१६**
**२) या संचालनालयाचे पत्र क्र. १६/आस्था/सॅनिटरी नॅपकीन/२०१६/१७२, दिनांक २०.६.२०१६**
**३) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, पत्र क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.४०/आस्था-२, दिनांक २४.२.२०२०**

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकित शासनपत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, श्रीम. विद्या चव्हाण, विधान परिषद सदस्य यांनी लक्षवेधी सूचनेमध्ये राज्यातील महिलांना सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी सॅनिटरी नॅपकीन वेंडिग मशीन्स, डिस्पोजल मशीन बसविणे व स्वच्छता याबाबत ठोस कार्यक्रम राबविण्याबाबत मुद्दा उपस्थित केला आहे.

सदर प्रकरणी या संचालनालयाच्या संदर्भांकित पत्र क्रमांक १ अन्वये आपल्या अधिपत्याखालील शासकीय / अशासकीय अनुदानित / विना अनुदानित संस्था तसेच कार्यालयांमध्ये सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीन्स व डिस्पोजल्स मशीन्स बसविण्याबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत, सोबत पत्राची प्रत जोडत आहे.

तरी, आपल्या कार्यालयात तसेच आपल्या अधिनस्त संस्थांमध्ये उपलब्ध असलेल्या अनुदानातुन सॅनिटरी नॅपकीन वेडिंग मशीन्स व डिस्पोजल मशीन बसविण्याच्या सूचना देण्याबाबत यापत्रान्वये पुःनश्च कळविण्यात येत आहे. तसेच याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयाच्या संदर्भांकित पत्र क्रमांक २ सोबतच्या तक्त्यात एकत्रीत भरून संचालनालयास तात्काळ सादर करावा.

(प्र.अं. नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:श्री. अमोल उगलमुगले, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना त्यांच्या दिनांक २४.२.२०२० रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने माहितीकरीता अग्रेषित.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक ११६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२,२२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH  E-mail :- desk16 dte@gmail.com  Internet :- http//www.dte.org.in

अतितात्काळ
प्रथम प्राधान्य

क्रमांक : १६/आस्था/सॅनिटरी नॅपकीन/२०१६/ ९७०२
दिनांक : 20 JUN 2016

प्रति,
१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

**विषय:Installation of a Sanitary Napkin Vending Machine in all Educational Institutions.**
**संदर्भ:**१) उच्च व तंत्र शिक्षण विभागीय यांचे क्र. निवेदन-२०१६/(प्र.क्र.०१/१६) तांशि-१, दिनांक १०.५.२०१६.
२) या संचालनालयाचे पत्र क्रमांक:१६/आस्था/संकीर्ण/२०१६/७६, दिनांक : २३.०२.२०१६.

उपरोक्त विषयाच्या संदर्भात राष्ट्रीय महिला आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक ३.९.२०१४ च्या पत्राच्या अनुषंगाने आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांमध्ये सॅनिटरी नॅपकीन व्हेंडीग मशिन बसविण्याबाबत या संचालनालयाच्या वरील संदर्भ क्र. २ पत्रान्वये निर्देश देण्यांत आलेले होत. मा. नरेंद्र बाबुराव पवार विधानसभा सदस्य,१३८, कल्याण (पश्चिम) मतदार संघ यांनी राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थेने सॅनिटरी नॅपकिन व्हेन्डींग मशीन बसविण्याबाबत आदेश देणेबाबत दिनांक १०.२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मा. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री यांना उद्देशून निवेदन दिले आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांने मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अग्रेषित केलेले निवेदनावर योग्य ती कार्यवाही करुन या बाबतचा अहवाल सादर करणे बाबत सदर्भिय क्र. १ अन्वये कळविले आहे.

संदर्भिय क्र.१ च्या पत्राच्या अनुषंगाने आपल्या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / अशासकीय अनुदानित / अशासकीय विना अनुदानित संस्था तसेच कार्यालयामध्ये मुलींसाठी सॅनिटरी नॅपकिन व्हेन्डींग मशीन्स बसविल्याबाबचा अहवाल दिनांक २२.६.२०१६ पर्यंत खालील तक्तयात एकत्रीत भरुन या संचालनालास ई-मेलद्वारे सादर करण्यांत यावा, जेणेकरुन अहवाल शासनास सादर करणे शक्य होईल.

| अ.क्र. | संस्थाचा प्रकार | एकुण संस्था | मशीन बसविण्यात आलेल्या संस्थेची संख्या | मशीन बसविण्याची कार्यवाही चालू आहे. अशा संस्थाची संख्या | मशीन न बसविल्या संस्थाची संख्या | रकान ६ मध्ये संस्थाची कार्यवाही केव्हा पूर्ण होणार याची माहिती दयावी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | शासकीय संस्था | | | | | |
| २ | अशासकीय अनुदानित संस्था | | | | | |
| ३ | अशासकीय विना अनुदानित संस्था | | | | | |

(अशोक पिसे)
उपसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,
कार्यासन क्रमांक- ११, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती करीता सादर.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६२०६०२,२२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail :- desk16.dte@gmail.com Internet :- http//www.dte.org.in


अतितात्काळ

प्रथम प्राधान्य

क्रमांक : १६/आस्था/सॅनिटेरी नॅपकीन/२०१६/७६९

दिनांक : 23/2/2016

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

**विषय :Installation of a Sanitary Napkin Vending Machine in all Educational Institutions...**

**संदर्भ : या संचालनालयाचे पत्र क्रमांक:**

१) १६/आस्था/संकीर्ण/२०१४/शा.३२७११, दिनांक : ५.१२.२०१४.

२) ११/आस्था/सॅनिटेरिंग नॅपकीन/२०१५-१६/७५०, दिनांक : २८.७.२०१५.

३) २/एनजीसी/महिला आयोग/२०१६/१५७, दिनांक १.२.२०१६.

उपरोक्त विषयाच्या संदर्भात राष्ट्रीय महिला आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक ३.९.२०१४ च्या पत्राच्या अनुषंगाने आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांमध्ये सॅनिटरी नॅपकीन व्हेंडीग मशिन बसविण्याबाबत या संचालनालयाच्या वरील संदर्भ क्रमांक-१ च्या पत्रान्वये निर्देश देण्यांत आलेले आहेत. तथापि, याबाबत अद्याप पर्यत कार्यवाही झालेली नसल्याने पुन:श्च खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहे. सदरहू सूचना आपल्या स्तरावरुन विभागांतर्गत सर्व संस्थांना देण्यांत याव्यात.

१) आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय / अशासकीय संस्थानी आवश्यकते नुसार सॅनिटरी नॅपकीन व्हेंडीग मशिन बसविण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

२) सदर मशीन खरेदी करण्यासाठी लागणारा खर्च विद्यार्थी कल्याण निधी / कार्यलयीन खर्च / यंत्र सामग्री व उपकरणे या पैकी उपलब्ध निधीमधून करण्यात यावा.

३) मशीन खरेदी केल्यानंतर आवश्यक असणारा आवर्ती खर्च (सॅनिटेरि नॅपकीनसाठी) हा विद्यार्थीनी / महिला कर्मचारी यांच्याकडून घ्यावयाचा आहे.

४) मशीनची खरेदी, उभारणी दुरुस्ती व देखभाल या संदर्भात प्रत्येक संस्था स्तरावर महिला अधिकारी / कर्मचारी तसेच विद्यार्थीनी प्रतिनिधी यांची संयुक्त समिती गठीत करण्यात यावी व सदर समितीने प्राचार्यांना वेळोवेळी अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात यावे.

५) सॅनिटरी नॅपकीन व्हेंडीग मशिनचा पुरवठा करण्याऱ्या पुरवठादारांचे नाव व पत्ता खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पुरवठादारांचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | HLL LIFECARE LIMITED, Noida |
| २. | Bharti Sales, Amit Vaidya, (Proprietor) G.२४-२५ Kamla Tower, Beside Inox Multiplex, Indora Square, Nagpur ४४० ०१७ |
| ३. | Technocrats Security Systems Private, Limited, Nitin Munot (Director), Unit No.C-२, Model Industrial Estate,Off. Arey Road, Goregaon East, Mumbai ४०० ०६३. |
| ४. | Goodhealth Inc. Raman Sethi (Proprietor), No.२१०, D.D.A.Commercial Complex, C.M.१, Jhandewalan Extension, New Delhi ११००५५. |
| ५. | Beta Automation Mohan Das (Proprietor) No.२४१, Sakthi Colony, Krishna Kalyana Mandabam Road, RK Puram, Ganapathy, Coimbatore ६४१००६, Tamil Nadu. |
| ६. | Future Techniks India Pvt.Ltd., M Balasubramaniam (Managing Director),W-५६४, Park Road, Annanagar, West Extension, Chennai ६००१०१. |
| ७ | Lakshmi Associates, V.R.Aravamuthan (CEO) AC १३३, Shanthi Colony, Anna Nagar, Chennai ६०००४०. |
| ८ | Happy Napi Sanitary Products Pvt.Ltd., ७, Office : ७०३, Corporate Avenue, Sonawala Road, Goregaon East, Mumbai ४०००६३. |

तरी, आपल्या विभागांतर्गत सर्व संस्थानी, त्यांचे स्तरावर सॅनिटरी नॅपकीन व्हेंडीग मशिन खरेदीबाबत निर्णय घेऊन प्रक्रीया पूर्ण करण्याबाबत निर्देश देण्यांत येऊन, त्याबाबतचा कार्यपालन अहवाल दिनांक ३०.३.२०१६ पर्यंत या संचालनालया सादर करण्यांत यावा.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:

१. श्रीम. शी.रा. कदम, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई याच्या माहिती करीता सादर.

२. कार्यासन क्रमांक-२, २अ, १० व ११, मुख्य कार्यालय, मुंबई यांना आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.